# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 31/05/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर सावजी ढाबा उमरेड येथे दिनांक 30/05/2021 चे 10.40 वा. ते 11.10 वा. दरम्यान उमरेड पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एच. एच– 40/बीएल– 1816 क्रमांकाच्या आयसर गाडीला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये एकुण 20(19–म्हशी,1–हेला) कि. 3,90,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– 1) समीर अबीग खान, वय 35 वर्ष, रा. पिलीनदी नागपूर झोपडपटटी व 2) कमलेश नथ्तूलाल गुप्ता, वय 38 वर्ष, रा. आनंदनगर न्यू पिरायटी कॉलनी नागपूर यांच्या ताब्यातुन 20 जनावरे व वाहनासह एकुण किंमती 9,90,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई श्री. प्रकाश मुटकुरे, पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ),ए,9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 184,130/177 मोवाका काद्‌यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. किशोर ठाकुर 9022857682 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी रामटेक श्री भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री यशवंत सोलसे, पोलीस हवालदार किशोर ठाकुर, पोशी प्रकाश मुरकुटे व दोन होमगार्ड सैनीक यांनी केलेली आहे.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर